# ६० व्या वर्षीही नितीन गडकरींची उधळण सुरूच

**संपादकीय**
**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा ६० वा वाढदिवस कोट्यवधींची उधळण करीत शाही इतमामात साजरा झाला. आधीचा दोन वर्षांचा दुष्काळ आणि यावर्षी हमीभाव न मिळाल्याने महाराष्ट्रात किमान ३ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. हे आत्महत्येचे सत्र अजूनही सुरूच आहे. यात सर्वाधिक आत्महत्या विदर्भ आणि मराठवाड्यात होत आहेत, पण विदर्भाचे नेते नितीन गडकरी यांना शेतकऱ्यांबद्दल सहानुभूती वाटत नाही. शेतकरी आत्महत्या करीत असताना आपला वाढदिवस साधेपणाने करावा असा माणुसकीचा विचार त्यांच्या मनात वयाच्या ६० व्या वर्षीही येत नाही.

दोन वर्षे दुष्काळ आणि यावर्षी कोसळणारे भाव या दुष्टचक्रात अडकलेल्या शेतकऱ्याला ५० हजार ते दीड लाख रुपयांचे कर्जही फेडणे शक्य नाही. नवे कर्ज मिळत नाही, बियाणासाठी पैसा नाही, अशा स्थितीत शेतकरी आत्महत्या करतोय. त्याची मुलेबाळे अनाथ होतायत, कुटुंब निराधार होतात. एकीकडे एक-दीड लाखासाठी शेतकऱ्यांची कुटुंबच्या कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत आणि दुसरीकडे नितीन गडकरींनी केवळ आपल्या वाढदिवसाच्या जाहिरातींवर कोट्यवधी खर्च केले आहेत. त्यांच्या वाढदिवस सोहळ्यासाठी समिती नेमली गेली. या समितीवर उर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि 'वनराई'चे विश्वस्त गिरीश गांधी आहेत. गडकरींच्या वाढदिवसावर जी उधळण होत आहे त्याचे या दोघांनाही काही वाटले नाही. राज्यात आठ ते दहा तास वीज गूल असते त्यामुळे शेतकऱ्यांचे पाण्याचे पंप चालत नाहीत. याबाबत ना. बावनकुळेंना जसा खेद नाही तसाच या सोहळ्याबाबत गैर काही वाटत नाही. वनराईचे विश्वस्त गिरीश गांधी या सोहळ्याच्या आयोजनात सहभागी झाले हे तर महाराष्ट्राचे मोठे दुर्दैव आहे.

कस्तुरचंद पार्कच्या मोकळ्या जागेत भव्य शामियाना आणि व्यासपीठ उभारून नितीन गडकरींचा वाढदिवस सोहळा झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदींपासून अमित शहा ते विविध राज्यांचे मंत्री, उद्योजक खासगी विमानांचा धुराळा उडवत आले आणि सोहळ्याला उपस्थित राहून गेले. या विमानांचाही खर्चही काही कोटीत झाला. शिवाय भोजन, पाणी, सुरक्षा याचा अफाट खर्च होताच. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे महाराष्ट्रात सुरू केलेली 'शिवार संवाद यात्रा' सोडून 'साले'वाले दानवेंपासून सर्व मंत्री हुजरेगिरी करायला हजर झाले. आपल्या या शाही उधळणीवर टीका होणार हे माहीत असल्याने स्वतः गडकरींनी स्वतःलाच १ कोटी १ लाखाचा धनादेश दिला आणि ही रक्कम जनतेच्या भल्यासाठी १०० समाजसेवी संस्थांना दिल्याचे जाहीर केले. जनता खुळी आहे असे हे नेते अजून का समजतात हेच कळत नाही.

नितीन गडकरींनी स्वतःच्या वाढदिवस सोहळ्यावर जो कोट्यवधींचा पाऊस पाडला तो अद्याप थांबलेला नाही. ३० मे रोजी 'माननीय' गडकरी मुंबईत येऊन आणखी एकदा वाढदिवस साजरा करणार आहेत. विमानतळाजवळच्या सप्ततारांकित हॉटेलात विशेष निमंत्रितांसाठी संगीत आणि भोजनाचा कार्यक्रम आहे. काही वर्षांपूर्वी ऐन दुष्काळात नितीन गडकरींनी डोळे फाटतील अशा कुबेरी थाटात आपल्या मुलाचे लग्न केले होते. अजून त्यांची हौस संपलेली नाही. त्याच्या सोहळ्याला खाजगी विमानाने जितके नेते आले आणि गेले त्याचा जो खर्च झाला ती रक्कम शेतकऱ्यांना मदत म्हणून दिली असती तर किमान १०० शेतकरी बचावले असते. संपूर्ण सोहळ्यावर जो खर्च केला तो वाचवून ती रक्कम दिली असती तर हजारो शेतकरी कुटुंब बचावली असती. या कुटुंबांतील महिला सुवासिनी राहिल्या असत्या आणि त्यांनी प्रेमाने गडकरींना वाढदिवसाच्या दिवशी ओवाळले असते. पण ६० व्या वाढदिवसा दिवशीही गडकरींचे हृदय पाझरत नाही म्हणून आज फक्त त्यांच्या पत्नीने त्यांचे औक्षण केले. इतरांचे आशीर्वाद घेण्याचे भाग्य त्यांना लाभलेच नाही. गडकरींच्या अति खाण्याच्या सवयीने त्यांचे वजन वाढले तेव्हा शस्त्रक्रिया करून चरबी कमी केली होती. पण विचारांवर चढलेले थर अजून निघालेले नाहीत.

मुख्यमंत्री म्हणतात की, शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी सरकारकडे पैसे नाहीत. अशी परिस्थिती आहे तर हे डोळे दिपवणारे सोहळे कसे होतात? शेतकरी आंदोलने करतोय आणि मंत्री आणि नेते ओरबाडलेल्या संपत्तीवर मजा मारतायत हे दृश्य महाराष्ट्र सातत्याने का बघतोय? नितीन गडकरींचा 'पूर्ती' उद्योग एकेकाळी खूप गाजला. पैसा आणि अधिक पैसा यामुळे जिवंतपणी भौतिक यशाची स्वप्न'पूर्ती' होऊ शकते. पण शेवटी खांदा द्यायला प्रेमाचे चार हातही पुढे आले नाहीत तर मोक्ष मिळत नाही. उलट वाईट सवयींनी स्वतःसह कुटुंबाची वाताहात होते. हे अनेक पावसाळे पाहिल्यावर कळते असे म्हणतात. पण इथे मडकेच उपडे आहे. अनेक पावसाळ्यांचे पाणी वाहून गेले अन् गडकरी कोरडेच राहिले.